# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## १८ वे ३ दिवसीय यूएमआय राष्ट्रीय परिषद गुरुग्राम,हरियाणा येथे सुरु

## केंद्रीय मंत्री श्री खट्टर यांच्या हस्ते UMI येथील महा मेट्रो स्टॉलचे उद्घाटन



नागपूर: अर्बन मोबिलिटी इंडिया (UMI) परिषदेच्या १८ व्या आवृत्तीचे आज गुरुग्राम,हरियाणा येथे उद्घाटन झाले. या परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृहनिर्माण आणि नगर विकास व ऊर्जा मंत्री श्री मनोहर लाल खट्टर यांच्या हस्ते झाले, यावेळी केंद्रीय राज्यमंत्री(गृहनिर्माण आणि नगर विकास) श्री. तोखन साहू व श्री श्रीनिवास कटिकिथला सचिव - (केंद्रीय गृहनिर्माण आणि नगर विकास) प्रामुख्याने उपस्थित होते.

या राष्ट्रीय परिषदेच्या अंतर्गत आज महा मेट्रो स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. केंद्रीय मंत्री श्री खट्टर यांच्या हस्ते महा मेट्रोच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. महा मेट्रोने नागपूर, पुणे आणि ठाणे येथील प्रकल्पांतर्गत असलेल्या विविध विषयांचे चित्रण याठिकाणी केले आहे. महा मेट्रोच्या वतीने संचालक श्री. अतुल गाडगीळ आणि श्री. अनिल कोकाटे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. तसेच नागपूर,पुणे, ठाणे आणि नवी मुंबई लाईन - १ चे महा मेट्रोचे संचालक श्री. विनोद कुमार अग्रवाल,श्री. हरेंद्र पांडे,श्री. राजीव त्यागी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

उदघाटन दरम्यान उपस्थितांना संबोधिताना केंद्रीय मंत्री श्री. खट्टर यांनी सांगितले कि, आज आपण अशा ऐतिहासिक टप्प्यावर आहोत जिथे ५२० शहरे आणि अनेक ग्रामीण भाग शहरी स्वरूपात रूपांतरित होत आहेत. हे परिवर्तन केवळ संख्यात्मक नाही, तर हे आपल्या देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीचे प्रतीक आहे. प्रत्येक शहराने आपल्या विकासाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे — "सिटी शुड बी लायबल", म्हणजेच शहराने स्वतःच्या वाढीबरोबरच टिकाव आणि शाश्वततेकडे लक्ष द्यायला हवे.

श्री. खट्टर यांनी सांगितले कि, टीओडी पॉलीसी देशभरातील मेट्रो शहरामध्ये लागू करण्यात येणार आहे. उल्लेखनीय आहे कि,महा मेट्रोने प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच प्रामुख्याने नागपूर मेट्रोने टीओडी पॉलीसीची अंबालबजावनी केली आहे.

मेट्रो ५०-६० किमी नंतर अनेकदा आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य ठरते. त्यामुळे आता आम्ही RRTS — Rapid Rail Transport System या नव्या प्रकल्पाकडे वळलो आहोत. दिल्लीमध्ये एक लाईन कार्यान्वित आहे, आणि अनेक शहरांनी या प्रकल्पाची मागणी केली आहे. कॅबिनेट नोट तयार असून, लवकरच हे इतर प्रमुख शहरांमध्येही राबवले जाणार आहे.

मोबिलिटी हा आजच्या काळातील एक प्रमुख मुद्दा आहे. शहरांमध्ये वाहतुकीची सुलभता, परवडणारा प्रवास, आणि वेळेची बचत — ही आपल्या सर्वांची अपेक्षा आहे. म्हणूनच दरवर्षी आपण मोबिलिटी कॉन्फरन्स आयोजित करतो, जिथे तज्ञ एकत्र येऊन या विषयांवर सखोल चर्चा करतात.

शहरीकरण मोठ्या प्रमाणावर वेगाने होत आहे. त्यामुळे सहज आणि सुलभ वाहतुकीचे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. परंतु हेच आव्हान आपल्या प्रगतीचे साधन बनवायचे आहे. आपली अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. काही वर्षांपूर्वी बस ताफ्याचे स्वागत करण्यात आले होते. परंतु काळ बदलला आहे. २००२ मध्ये दिल्ली मेट्रोची सुरुवात झाली. २००५ पर्यंत ५ शहरांमध्ये २४८ किमीचा विस्तार झाला. आज २४ शहरांमध्ये १०८३ किमी लांबीचा मेट्रो नेटवर्क उभारण्यात आला आहे.

सध्या चीन हा पहिल्या क्रमांकावर आणि अमेरिका दुसऱ्या क्रमाकांवर असून भारत हा तिसऱ्या क्रमाकांवर असून भारतात सध्या ११०० किमीचे मेट्रोचे बांधकाम सुरू असून येणाऱ्या ३-४ वर्षात भारत हा अमेरिकेला मागे टाकत मेट्रो नेटवर्कच्या बाबतीत दुसऱ्या क्रमाकांचा देश असेल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

काही ठिकाणी मेट्रो स्टेशनवरील पार्किंग पूर्ण भरलेले असते. त्यामुळे आता सिटी पार्किंग पॉलिसी लागू केली जात आहे. हरियाणामध्ये ही पॉलिसी लागू झाली असून, दिल्लीमध्ये ती पुढील एका महिन्यात लागू होईल. आता मेट्रोचे मार्ग दुसऱ्या मजल्यावरून (elevated pathways) नेण्याचा विचार सुरू आहे. पहिल्या आणि शेवटच्या प्रवासातील (First & Last Mile) जोडणी सध्या प्रभावी नाही, पण आता त्या दिशेने विशेष लक्ष दिले जाणार आहे. १०,००० ई-बसेसपैकी ९३६० बसेस मंजूर करण्यात आल्या आहेत आणि १००० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.